SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103

Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/३४५ दि. 17 OCT 2020

# परिपत्रक

उन्हाळी 2020 मधील अंतिम वर्ष / अंतिम सत्रातील परीक्षा दि. 21 ऑक्टोंबर, 2020 पासून सुरू करण्यात येत असून सर्व अभ्यासक्रमाची वेळापत्रके विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देण्याचा विकल्प विद्यार्थ्याकडून घेण्यात आलेला आहे.

तथापी, खालील कारणास्तव जे विद्यार्थी परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी नजिकच्या कालावधीमध्ये विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येइल व याची माहिती वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

1. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (CET) /इतर शासकीय स्पर्धा परीक्षा इ. चे आयोजन विद्यापीठ परीक्षेच्या दिवशी असल्यास.
2. विद्यार्थ्यास स्वतःला कोव्हिड–19 विषाणूची बाधा झाली असल्यास.
3. समकक्ष विषयामुळे अथवा इतर कारणामुळे एकाच वेळी विद्यापीठाच्या दोन विषयाच्या परीक्षा असल्यास

उपरोक्त नमूद कारणासाठी विशेष परीक्षेस बसण्याची परवानगी मिळण्यासाठी सर्व आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या प्रती महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/अधिविभागाच्या मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांच्यामार्फत संबंधीत ऑन परीक्षा विभागात सादर करणे आवश्यक आहे.

सर्व सलंग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/अधिविभागातील सर्व मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे.

(श्री. गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत– माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
1. मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
   सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था/अधिविभाग,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. मा. कुलगुरू कार्यालय
3. मा. कुलसचिव कार्यालय
4. संकेतस्थळ विभाग – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
5. जनसंपर्क विभाग – योग्य त्या प्रसिध्दीसाठी